पिंपरी चिंचवड महानगरपालिका
"इ" क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभाग
इक्षेका/प्रशा/१/कावि/ ८०१/२०१८
दिनांक : २६/०७/ २०१८

**विषय - पी.जी.पोर्टल, आपले सरकार, म.न.पा. वेब पोर्टल मा.आयुक्त शेरांकन, दै.वृत्तपत्रातील बातम्या,व्हॉट्सअँप मेसेज इ. मार्फत प्राप्त होणा-या तक्रारी बाबत.**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे "इ" क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्रमांक ३, ४, ५, व ७ या प्रभागांचा समावेश करण्यात आलेला आहे. कार्यालयांतर्गत स्थापत्य, पाणी पुरवठा, जलनिसा:रण, व आरोग्य विभागाचे कामकाज केले जाते. क्षेत्रिय कार्यालयाने त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रभागांमध्ये विविध नागरी सोयी सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे नागरीकांच्या विविध तक्रारींचे वेळचे वेळी निवारण करणे तेवढेच आवश्यक आहे. नागरिकांच्या तक्रारी पी.जी.पोर्टल, आपले सरकार, सारथी वेब पोर्टल, मा.आयुक्तांकडे/ विभागांकडे केलेल्या लेखी तक्रारी, तसेच दै.वृत्तपत्रांतील तक्रार इ.नुसार कार्यालयाकडे प्राप्त होत आहे.

सबब सदरचे परिपत्रकान्वये "इ" क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य, विदयुत, पाणी पुरवठा, जलनिसा:रण व आरोग्य या विभागांचे शाखा प्रमुखांना कळविण्यात येते की, "इ" क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व तक्रारींचे विषयानुसार रजिस्टर तयार करुन त्यात नोंद घेणे आवश्यक आहे.

सदयस्थिती सर्व संबंधित कर्मचारी त्यांचे शाखा प्रमुखांचे सुचनेनुसार सदर तक्रारी निरस्त करण्याचे कामकाज करीत आहेत. उपरोक्त प्रमाणे तक्रारी निरस्त करण्यासाठी संबधित विभागांनी तक्रार निवारण रजिस्टर मध्ये आवश्यक ते पूर्तता अहवाल तयार करणे आवश्यक आहे. प्राप्त तक्रारींचे संगणकावरुन प्रिंट/ झेरॉक्स काढून सदर तक्रारीची रजिस्टवर नोंद घेऊन केलेल्या कार्यवाहीचा तपशिल व संबंधित तक्रारदार यांना तक्रार निवारण केलेबाबत कळवून त्यानुसार नोंदी घेणेत याव्यात. योग्य ती तक्रार निवारण पध्दत अवलंबण्यात न आल्याने वेब पोर्टलवर अशा तक्रारींचे निराकारण झाले नसलेबाबतची तक्रार तक्रारदार पुनश्च करीत आहे. यामुळे नागरीक व प्रसिध्दी माध्यम थेट मनपाच्या कामकाजाविषयी शंका उपस्थित करतात. सदरची बाब ही मनपाच्या कार्यालयीन कामकाजाच्या संदर्भात असल्याने याबाबत गांभीर्याने कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयाशी संबधित कोणत्याही तक्रारींचे निराकारण करताना तक्रार निवारण रजिस्टर मध्ये नोंद घेणेत यावी. सदर रजिस्टरमध्ये शाखा प्रमुखाची स्वाक्षरी घेणेत यावी. वेब पोर्टल वरुन तक्रार निरस्त केल्यानंतर ती तक्रार पुन्हा वेब पोर्टल मध्ये दिसणार नाही याची खातरजमा करावी. कोणत्याही वेळी पूर्वसुचना न देता पोर्टल, वृत्तपत्रांचे तक्रारीनुसार रजिस्टर व केलेल्या कारवाईचा तपशिल समक्ष तक्रारीचे ठिकाणी जाऊन तपासण्यात येईल, या मध्ये कसूर झाल्यास संबधित कर्मचा-यांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार नियमाधिन कारवाई करणेत येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

श्रीनिवास दांगट
क्षेत्रिय अधिकारी
"इ" क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत - १) स्थापत्य विभाग/विदयुत विभाग/पाणीपुरवठा विभाग
जलनिसा:रण विभाग/आरोग्य विभाग
इ क्षेत्रीय कार्यालय
२) मा.अतिरिक्त आयुक्त (१)
प्रशासन विभाग
३) मा.अतिरिक्त आयुक्त (२)